# ज्योतिर्मय

साहित्याचे विद्यापीठ

Online Journal of Literature....

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक १४७ वा ❑ गुरूवार दि.२४ जुलै २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

### शाळांमध्ये वीजरोधक यंत्र लावणे गरजेचे

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय 📖 साहित्य

शालेय इमारती विद्यार्थ्यांसाठी सुरक्षित असायला पाहिजेत. शाळा ही विद्यार्थ्यांसाठी एक सुरक्षित आणि संरक्षणाचे ठिकाण असायला पाहिजे. शाळेतील इमारत, परिसर आणि शिक्षणाचे वातावरण विद्यार्थ्यांसाठी सुरक्षित आणि निरोगी असणे आवश्यक आहे.शाळेत आपत्कालीन परिस्थितीसाठी योजना असायला पाहिजे.अलीकडे नैसर्गिक संकटासह वीज पडण्याचे प्रमाण वाढत आहे.

विजांचा कडकडाट आणि ढगांमध्ये वीज तयार होण्याची प्रक्रिया नैसर्गिक आहे. ढगांमध्ये पाण्याच्या कणांच्या घर्षणातून वीज तयार होते. जेव्हा ढगांमध्ये पुरेसा विद्युतभार साठतो, तेव्हा तो जमिनीकडे आकर्षित होतो आणि वीज चमकते. उंच इमारती किंवा झाडं यांसारख्या ठिकाणी वीज पडण्याची शक्यता जास्त असते, कारण ते जमिनीपेक्षा उंच असतात आणि विजेला आकर्षित करतात.

शाळेवर वीज पडण्याची शक्यता कमी असली तरी, शाळेच्या इमारतीजवळ किंवा परिसरात वीज पडल्यास धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे, शाळेच्या इमारतीजवळ उंच झाडं किंवा विजेचे खांब असतील, तर त्यांची योग्य ती काळजी घेणे आवश्यक आहे. यासाठी शाळांमध्ये वीजरोधक यंत्र लावण्याची गरज आहे. कारण, वीज पडल्यास जीवितहानी आणि मालमत्तेचे नुकसान टाळता येते. विशेषतः उंच इमारती, जसे की शाळा, यावर वीज पडण्याची शक्यता जास्त असते. त्यामुळे, वीज रोधक यंत्र बसवणे आवश्यक आहे.

रामटेक तालुक्यातील वडंबा जिल्हा परिषद शाळेवर वीस कोसळली.७० हून अधिक अधिक विद्यार्थी, शिक्षक व कर्मचारी थोडक्यात बचावले मात्र इमारतीला खोलतडे गेले आणि विद्युत उपकरणे भस्म सात झाले मृत्यूने दारात थांबूनही मागे फिरण्याचा अनुभव शाळेने घेतला. शाळांमध्ये विद्यार्थी असतात वीस पडल्यास कोटी दुर्घटना होण्याची शक्यता असते. जीवितहानी आणि मालमत्तेचे नुकसान टाळण्यासाठी विद्युत रोधक यंत्र महत्वाचेआहे.शाळांमध्ये विद्यार्थ्यांची आणि कर्मचाऱ्यांची सुरक्षा सुनिश्चित करणे अत्यंत आवश्यक आहे. वीज रोधक यंत्र बसवून, शाळेला विजेच्या धोक्यापासून वाचवता येते.

वीज रोधक यंत्र, ज्याला आपण तडित चालक असेही म्हणतो, हे एक धातूचे टोकदार साधन आहे. ते इमारतीच्या सर्वात उंच भागावर बसवले जाते. जेव्हा वीज पडते, तेव्हा ते जमिनीकडे एक सुरक्षित मार्ग तयार करते, ज्यामुळे वीज इमारतीला न लागता सरळ जमिनीत जाते.

शाळेतील इमारती, विद्यार्थी आणि कर्मचाऱ्यांचे विजेच्या धोक्यापासून संरक्षण करते. नैसर्गिक आपत्तीच्या काळात, जसे की वादळ, शाळेचे संरक्षण करणे आवश्यक आहे.अनेक ठिकाणी, वीज रोधक यंत्र बसवणे कायद्याने बंधनकारक आहे.







## ‘आपलं मंत्रालय’ गृहपत्रिका अंकाचे प्रधान सचिव डॉ. अतुल पाटणे यांच्या हस्ते प्रकाशन

**मुंबई** – महाराष्ट्र शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयातर्फे प्रकाशित होणाऱ्या ‘‘आपलं मंत्रालय’’ या गृहपत्रिकेच्या जून २०२५ या अंकाचे प्रकाशन प्रधान सचिव डॉ. अतुल पाटणे यांच्या हस्ते झाले.

यावेळी सामान्य प्रशासन विभागाचे अवर सचिव (मावज) अजय भोसले, माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे संचालक (माहिती)(प्रशासन) हेमराज बागुल, उपसंचालक(प्रशासन) गोविंद अहंकारी आदी मान्यवर उपस्थित होते.

‘आपलं मंत्रालय’ गृहपत्रिकेच्या अंकामध्ये पर्यावरण धोरण, २०२४ अंतर्गत शासनाची भूमिका, पर्यावरण रक्षण व संवर्धनाच्या दृष्टीने शासनाच्या विविध



योजनांची आणि उपक्रमांची माहिती, तसेच, पर्यटनाशी निगडित आवश्यक पायाभूत सुविधा, पर्यावरणपूरक पर्यटन विकास, व स्थानिक समुदायांच्या सहभागाची भूमिका यावर आधारित सविस्तर माहिती देण्यात आलेली आहे.

मंत्रालयातील विविध विभागांतील अधिकारी व कर्मचारी यांनी स्वत: भेट दिलेल्या ठिकाणांची माहिती आणि त्यांच्या वैयक्तिक अनुभवांवर आधारित प्रवासवृत्तांताचा समावेश या विशेषांकात करण्यात आलेला आहे.



ज्योतिर्मय 📖 साहित्य

**विभागीय क्रीडा संकुल नवीन रुजू झालेले उपसंचालक श्री शेखर पाटील यांचे विभागीय क्रीडा संकुल कोचेस संघटनेतर्फे तर्फे स्वागत करण्यात आले. यावेळी विनोद माने क्रिकेट श्री भिकन अंबे स्केटिंग श्री सिद्धार्थ जाधव बॅडमिंटन श्री भरत रेड्डी अथलेटिक्स श्री रोहित गाडेकर squash, श्री रंजीत पवार जिम्नॅस्टिक सौ अंजलीताई शिरशीकर (छत्रपती छत्रपती पुरस्कार विजेते व विजेत्या) डॉक्टर श्री विठ्ठल नरके तिरंदाजी श्रीकांत बॅडमिंटन व श्री असलम शेख फुटबॉल इंडियन्स जिम लाँग टेनिसचे श्री मिश्रा हे सर्वजण हजर होते यावेळी उपसंचालक यांनी या सर्व खेळांच्या कोचेस बरोबर चर्चा केली.**

## ट्रम्प पुतीन संघर्षाची ठिणगी आणि महायुद्धाची भयघंटा

ज्योतिर्मय 📖 साहित्य

**(मागील अंकावरून)**

प्रथम त्याने चीनवर ६० % व्हिएतनाम वर २५ % व युरोपीयन कार उद्योगावर ४० % कर लादला, प्रतिउत्तर म्हणून चीननेही तशी कारवाई केली मेक्सिको सीमेवरून हजारो लोकांना परत पाठविण्यात आले.

पुतीन कुठे चुकले

रशियाचे अध्यक्ष ब्लादीमोर पुतीन हे सुद्धा हट्टाला पेटले आहेत त्यांना युक्रेनचा बळकावलेला ३० टक्के प्रदेश कायमचा हडप करावयाचा आहे तर युक्रेन मात्र आपली एक इंच ही जागा द्यावयास तयार नाही युक्रेन कडे रणगाड्यांचा आणि युद्ध सामग्रीचा अभाव आहे त्यामुळे समोरासमोरच्या जमिनी लढाईत रशियाने युक्रेनला चांगलेच मागे सरकावले आहे तसे पाहिले तर रशियाची सुद्धा जीवित वित्तहानी काही कमी झालेली नाही परंतु तरीही देखील सुंभ जळाला तरी पीळ कायम आहे या न्यायाने पुतीन वागत आहेत. पुतीन यांना धडा शिकावीण्यासाठी ट्रम्प युक्रेनला प्रत्यक्ष अप्रत्यक्ष दारूगोळा व शस्त्रे पुरवत आहे या संघर्षाचा अर्थपूर्ण निकाल काय लागेल?

हट्टी ट्रम्प आणि हेकट पुतीन

यांच्यातील ही लढाई कुठल्या टोकाला जाणार हे आज सांगता येणार नाही परंतु जर ट्रम्प यांच्या जिभेला त्यांनी आवरले नाही तर पुतीन यांना आपला अपमान वाटेल आणि ते एकापेक्षा अधिक कठीण असे पवित्रे घेऊन युक्रेनवर संपूर्ण विजय मिळविण्याचा प्रयत्न करतील ज्या पद्धतीने नेटाने हो हे इजरायलचे नेते संपूर्ण गाझापट्टीवर विजय मिळविण्यासाठी हट्टाला पेटले आहेत तसेच पुतीन हे सुद्धा संपूर्ण युक्रेन वर विजय मिळविण्यासाठी दुराग्रहाने वागत आहेत. उभयतामध्ये समेट घडवून आणण्यात डोनाल्ड ट्रम्प यांना फारसे यश आले नाही, त्यामुळे निराशेने ग्रासलेले ट्रम्प महोदय आता जगावर पॅरिसच्या चाबकाचे फटकारे अधिक जोरदारपणे मारत आहेत परंतु या फटकेबाजीत जसे जगाचे नुकसान होत आहे तसेच त्यांच्या देशाच्या अर्थव्यवस्थेला सुद्धा हानी पोहोचत आहे, घसरत असलेला अमेरिकेतील शेअर बाजार बेकारीचे वाढते प्रमाण तसेच चलन फुगवटा आणि महागाई यामुळे अमेरिकेचे अर्थकारण त्रस्त झाले आहे. डोनाल्ड ट्रम्प यांच्या अतिरेकी राजकारणाला वैतागून एलन मस्क यांनी त्यांना राम राम ठोकला, आता खुद्द रिपब्लिकन पक्षातील एक फळी सुद्धा त्यांच्यावर नाराज आहे. अशा वेळी डोनाल्ड ट्रम्प कोणता पवित्रा घेणार हा खरा प्रश्न आहे बुडत्याचा पाय खोलात या न्यायाने डोनाल्ड ट्रम्प यांची गती होत आहे पण तरीही ते आत्मपरीक्षण करण्यास तयार नाहीत ही खरी शोकांतिका आहे.

ट्रम्प यांनी युद्धबंदीसाठी दिलेली ५० दिवसाची मुदत २ सप्टेंबर रोजी संपणार आहे युद्ध थांबले नाही तर आक्रमक राजकारण आणि आर्थिक कोंडीची रणनिती वापरण्याच्या तयारीत ट्रम्प आहेत. बऱ्या बोलाने ट्रम्प बधले नाही तर १०० % दुप्पट कर लावण्याची धमकी दिली आहे, युक्रेनला पेट्रियाट क्षेपणास्त्रे पुरविण्याची योजना आहे. गाव जले हनुमान बाहर या न्यायाने हा खर्च मात्र युरोपीयन युनियन वर लादण्याचा ट्रम्प यांचा डाव आहे त्यासाठी नाटो देशानी जीडीपी च्या ५ % खर्च करावा असा अफलातून सल्लाही ट्रम्प यांनी दिला आहे.

नवी समीकरणे कोणती

युक्रेनला शस्त्रे पुरविण्याच्या आणि रशियावर आर्थिक निर्बंध लादण्याच्या ट्रम्प यांच्या निर्णयामुळे आता शस्त्र संधीची आशा मावळत आहे असे रशियाला वाटते आपण धमक्यांना घाबरत नाही



आणि अल्टिमेटमची परवा करत नाही असे पुतीन म्हणतात नवीन निर्बंध लादून ब्लॅकमेल करण्याचा प्रकार रशिया सहन करणार नाही असे संकेत रशियन नेते देत आहेत, याचा अर्थ काय असेल तर आता आकाश फाटत आहे त्याला ठिगळे तरी किती लावणार. अमेरिका कीव ला शस्त्रास्त्रे आणि क्षेपणास्त्रे देत आहे या संदेशामुळे रशियन नेते अधिक बीथरले आहेत फेब्रुवारी २०२२ मध्ये रशियाने युक्रेनवर आक्रमण केल्यानंतर संबंध युरोपला हादरवून टाकणारे युद्ध जगाने पाहिले या रक्तरंजित संघर्षात




दुसऱ्या महायुद्धानंतर प्रथमच एवढी मोठी जीवित आणि वित्तहानी झाली आहे आजवर रशिया युक्रेन युद्धात १२ लाख लोक मारले गेले आहेत किंवा जखमी झाले आहेत हा आकडा दुसऱ्या महायुद्धातील हानी पेक्षाही मोठा आहे ५० दिवसाच्या आत जर रशियाने युद्ध थांबविले नाही तर अमेरिका रशियावर १००% कर लादण्याचा विचार करत आहे. जर मास्को ने ५० दिवसाच्या मुदतीत युद्धबंदी केली नाही तर रशियाचे तेल खरेदी करणाऱ्या देशावर सुद्धा दुय्यमनिर्बंध लादण्याचा इशारा अमेरिकेने दिला आहे.

हमास ला ६० दिवसाच्या युद्धबंदी चा प्रस्ताव देण्यात आला आहे, त्यासाठी इस्रायल व हमासवर दबाव वाढविण्याचा ट्रम्प यांचा प्रयत्न आहे, हमासने युद्धबंदी स्वीकारली नाही तर त्यांचे गंभीर परिणाम भोगावे लागतील असा ढोल ही ट्रम्प बडवीत आहेत. त्याने इस्राईलला ३३,४०० कोटी रुपयाची लष्करी मदत देऊ केली आहे, उध्वस्त गाझा पट्टीची बांधणी मात्र सौदी अरेबिया आणि कतार यांनी करावी त्यासाठी ८३,५०० कोटी रुपये गुंतवावेत असा अजब आराखडा ट्रम्प देतात. आयजी च्या जीवावर बायजी उदार असा ट्रम्प यांचा खाक्या आहे, गाझा पट्टीतील २० लाख लोकांची उपासमार ट्रम्प यांना दिसत नाही काय ?

ट्रम्प यांचा अंगूलि निर्देश

भारताकडे आहे हे सांगण्याची वेगळी गरज नाही काही निरीक्षकांच्या मते अमेरिकेच्या या तिरकस धोरणामुळे रशिया चीन व भारत यासारखी अनेक देश एकत्र येण्याची शक्यता आहे त्यामुळे ट्रम्प यांनी थोडा सावध पवित्रा घेऊन आपले शत्रू कसे विभागले जातील याचा विचार करायला हवा परंतु ते खरा मित्र कोण खरा शत्रू कोण हे ओळखण्यात सुद्धा अपयशी ठरत आहेत ही दुर्दैवी बाब होय. जगातील दोन मोठ्या महासत्ता मध्ये सध्या सुरू असलेले छायायुद्ध किंवा प्रॉक्सिवार हे भविष्याच्या दृष्टीने धोकादायक आहे. त्यातून ठिणगी पडल्यास तिसरे महायुद्ध पेटू शकते, ट्रम्प यांनी लादलेल्या नव्या निर्बंधामुळे जागतिक वातावरणात कटूता निर्माण होत आहे असे गढूळ वातावरण शांततेसाठी धोकादायक आहे आणि हे सारे कुठेतरी थांबले पाहिजे.

२२ वर्षानंतर अमेरिकेने थेट युद्धात प्रवेश केला व इराणवर हल्ला केला त्यामुळे इराणच्या अणू स्थळाचे अपरिमित नुकसान झाले जर इराणने प्रति कारवाई केली तर अमेरिकेला ती महागात पडू शकते, त्याची चुणूक इराणने अमेरिकेच्या कतार येथील लस्करी तळावर हल्ला करून दाखविली आहे.

रशियाकडून तेल किंवा वायू खरेदी करणाऱ्या भारतासारख्या देशावर १०० % दुय्यम कर लादण्याची धमकी चिंताजनक आहे, ठोशास ठोसा ( ) म्हणून आशियायी देशांनी प्रति कारवाई केल्यास अमेरिकन बाजार ठप्प होऊ शकतो.

ट्रम्प यांचे बीग ब्युटीफुल बील अखेर मंजूर झाले. १२.४५ लाख कोटी रुपयांच्या संरक्षण निधी ट्रम्प खर्च करतील त्या बदल्यात अमेरिकेतील गरिबी व बेकारीच्या कल्याण निधीला कात्री लावण्यात आली आहे. तसेच कोलंबीया, ओक्सफोर्ड हॉवर्ड व इतर विद्यापीठा वरील विकास व संरक्षण निधीवर गंडांतर आले आहे. दररोज ३ हजार स्थलांतरिताना अटक करण्यात येत आहे, शिक्षण आणि समाजकल्याण विभागातील १४०० कामगारांची गच्छन्ति करण्यात आली आहे. विकास कार्यक्रमावरील १८२६० कोटी रुपयांचा निधी कमी करण्यात आला आहे.

भारतावर गंभीर परिणाम

१५०० हून अधिक भारतीयांना अमेरिकेतून हद्दपार करण्यात आले आहे प्रथम १० % बेस लाईन निर्यात कर लावण्यात आला. स्मार्ट फोन, बासमती तांदूळ आणि औषधं उद्योग यांना ट्रम्प नितीचा फटका बसत आहे.

व्हिसा निर्बंधमुळे गतवर्षीच्या तुलनेत २७ % पेक्षा व्हिसाचे प्रमाण कमी झाले आहेत.

शांतीदूत नरेंद्र मोदी पुतीन आणि ट्रम्प यांच्यातील शाब्दिक युद्धाचे रूपांतर युद्धामध्ये होऊ नये आणि आता पुतीन यांनी युक्रेनचा संपूर्ण घास घेण्याची घाई करू नये, त्यांनी आपल्या आणि युरोपच्या शांतता व सुरक्षेचा विचार करून युद्ध थांबविणे हिताचे आहे याबाबतीत सध्या जोखुर डोनाल्ड ट्रम्प अधिकाधिक सैराट होत आहेत आणि युक्रेनला फुस देणारे नाटो देश आणि काही युरोपीय सत्ता यामुळे युद्धाच्या गडगडाटात काही केल्या थांबत नाही हे सारे धोकादायक चित्र लक्षात घेऊन भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अमेरिका रशिया युक्रेन तसेच हमास इजरायल पॅलेस्टाईन यांची आंतरराष्ट्रीय गोलमेज परिषद घ्यावी. भारताने तटस्थ राष्ट्र म्हणून याबाबतीत मैत्री आणि शांततेसाठी पुरस्कार केला पाहिजे पुढाकार घेतला पाहिजे तसे झाले तर संभाव्य तिसरे महायुद्ध टाळता येईल आणि लक्षावधी लोकांचे रोज उध्वस्त होत असलेले जीवन सावरता येऊ शकेल जगाचे धान्याचे कोठार युक्रेन पूर्णपणे उध्वस्त झाले आहे तसेच गाझापट्टीतील पॅलेस्टाईन पॅलेस्टिनी लोकांचे जीवन सुद्धा विनाशाच्या मार्गावर आहे युक्रेनच्या आणि गाझापट्टीच्या पुनर्वसनाला तीन दशके लागली तरी देखील ती अपुरी आहेत शिवाय त्यासाठी लागणारा पैसा साधनसामग्री आणि मानवीय मदत कोण देणार आहे संयुक्त राष्ट्रसंघाने याबाबतीत अळीमिळी गुप चीळी अशी बघ्याची भूमिका न घेता शांततेसाठी पुढाकार घेतला पाहिजे

समारोप- युद्धबंदी करायला निघालेले ट्रम्प अप्रत्यक्षपणे आगीत तेल ओतत आहेत त्यामुळे ते शांततेच्या मृगजळा मागे धावत आहेत काय असा प्रश्न पडतो खरे तर युद्धाने प्रश्न सुटत नाहीत ते अधिक बिकट होत असतात.

जागतिक संघटना हातबल झाल्यामुळे महासत्ता अधिक चौखूर होतात आणि आपणास वाटेल तसे निर्णय घेतात ही गोष्ट दुःखद क्लेषदायक आणि तेवढीच चिंताजनक आहे या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अष्टपैलू परराष्ट्रमंत्री जयशंकर यांनी जर पुढाकार घेतला आणि टोकाला गेलेली भांडणे सोडविण्यासाठी प्रयत्न केला तर जगात शांतता निर्माण होऊ शकेल भविष्यकाळात सर्व जागतिक व्यासपीठावरून भारताला शांततेचा आग्रह धरावा तसे झाले तरच सबंध जगामध्ये शांतता प्रस्थापित होऊ शकेल आणि भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे शांतिदूत ठरतील आणि त्यांच्या महतप्रयासामुळे त्यांना जागतिक शांततेचे नोबेल पारितोषिक द्यावे लागेल आगामी ५० दिवसात हे चित्र निश्चितच शांततेच्या दृष्टीने नवी पहाट घडवू शकेल यात शंका नाही.

भारताला त्यासाठी अमेरिका रशिया चीन यांच्यापैकी कोणाचीही बाजू न घेता त्यांच्याशी सम समान अंतर ठेवावे लागेल, नाटो आणि भारताला युक्रेनच्या बाजूने वळविण्यांचा प्रयत्न करीत आहे परंतु त्याची परवा करता कामा नये, सक्रिय तटस्थता हीच भारताची शक्ती आहे आणि भक्कम भारत जगाला शांततेची संजीवनी देऊ शकतो.

जगातील नेते आपापसात भांडत असताना त्यांना शांतता व संवादाची कूटनीती भारतच शिकवू शकतो. अंधारात सापडलेल्या जगाला शांततेचा मार्ग श्रीकृष्णाने हाती सुदर्शन चक्र घेतले तरच सापडू शकेल. नरेंद्र मोदी अशी श्रीकृष्णाची भूमिका घेतील काय हा खरा प्रश्न आहे .


ज्योतिर्मय

साहित्याचे विद्यापीठ

जगप्रसिद्ध, वर्ल्ड रेकॉडीस्ट, रंगचिकित्सिक वास्तुतज्ज्ञ, भारतीय प्रतिकशास्त्र चिन्ह, आकार, धार्मिक आणि आध्यात्मिक विषयांचे अभ्यासक

डॉ. गजानन समर्थ

उपाख्य

(डॉ. गजानन सिताराम शेपाळ) यांचे

वास्तुशास्त्र पेंटींग्ज

या विषयांवरील अद्‌भुत माहिती याच ठिकाणी, लवकरच...!!

द्वारा

एस्.व्ही.एस्. कला प्रतिष्ठान

संपर्क : 98691 30238


SVS KALAA pratishthan

## मंत्र पुष्पांजली बद्दल थोडंसं...

भारतीय इतिहासात अयोध्येचा एक राजा खणिनेत्र होऊन गेला. हा राजा प्रजेवर अत्याचार करत असे, म्हणून एक दिवस प्रजेने राजाला राजपदावरून बेदखल केलं. राजाची हकालपट्टी करणारी प्रजा हे एक विलक्षण उदाहरण इथे सापडतं. खणिनेत्राला पायउतार करून त्याचा मुलगा खाणिनेत्राला राजा बनवले व सुयोग्य कारभार करण्यासाठी अनेक अटी प्रजेनी घालून दिल्या. वडिलांनी शेजारी राज्यांशी शत्रुत्व पत्करल्यामुळे खाणिनेत्राला वारंवार आक्रमणांच्या संकटाला तोंड द्यावे लागले. पण प्रजेच्या भक्कम पाठिंब्याने तो विजयी झाला आणि त्याने चांगले राज्य केले.

क्रमश: ......

## शुकासारखे पूर्ण वैराग्य


## उगवतीचे रंग

विश्वास देशपांडे
चाळीसगाव
मो.९४०३७४९३९२

**ज्योतिर्मय साहित्य**

समर्थ रामदासांनी आपल्याला प्रयत्नवादाची शिकवण दिली आणि क्रियेवीण वाचाळता व्यर्थ आहे हा संदेश दिला. समर्थांच्या महान कार्याबद्दल थोडे जाणून घेऊ या.


समर्थ रामदासांचे कार्य छत्रपती शिवाजी महाराजांना स्वराज्य स्थापनेच्या कार्यात सहायक आणि मार्गदर्शक होते. या दोघांनीही मानवताधर्म जागता ठेवण्यासाठी आपले आयुष्य वेचले. दोघांचेही उद्दिष्ट एकाच होते. स्वधर्म, स्वदेश यांची स्थापना करून जनतेमध्ये स्वदेशाभिमान, स्वधर्माभिमान जागृत करणे. हे करताना मात्र इतर धर्मियांचा द्वेष या दोघांमध्ये कोठेही नव्हता. दोघांचे ध्येय एक होते पण मार्ग वेगळे होते. मात्र त्यांच्यामध्ये एक साम्य होते ते हे की दोघांनी हे कार्य स्वबळावर व प्रचंड आत्मविश्वासाच्या जोरावर केले.



मराठा तितुका मेळवावा, महाराष्ट्रधर्म वाढवावा .

या जाणिवेतून या दोघांनीही अपार परिश्रमातून संपूर्ण जनतेमध्ये राष्ट्राभिमान व राष्ट्रप्रेम जागृत केले. परकीय सत्तेविरुद्धची चीड लोकांच्या मनात निर्माण केली. प्रत्येक वेळी दोघेही आपापल्या कार्यप्रणालीमध्ये नायकाच्या भूमिकेत स्वतः उभे राहिले. परकीय सत्तेची गुलामगिरी करताना मानसिक गुलामगिरीची वृत्तीही अंगिकारलेल्या लोकांना जागृत करण्यासाठी समर्थांनी जय जय रघुवीर समर्थ या मंत्राचा उद्घोष करून चैतन्य आणले. तर आपल्या सैन्याच्या फुरफुरणाऱ्या बाहुंमध्ये चैतन्य आणण्यासाठी शिवरायांनी हर हर महादेव हा स्फूर्तिदायी मंत्र उच्चारला.

मराठवाड्यातील जांब या गावी समर्थ रामदासांचा जन्म झाला तो दिवस होता चैत्र शु. नवमी. त्यांचे नाव नारायण. वडील सूर्याजीपंत ठोसर व आई राणूबाई. पिढ्यानपिढ्या चालत आलेले कुलकर्णीपद आणि पिढ्यानपिढ्या चालत आलेली श्रीरामाची आणि सूर्यनारायणाची उपासना त्यांच्या कुटुंबात होती. लहानपणापासूनच जुलमी परकीय सत्तेचा परिचय त्यांना झाला होता म्हणून वयाच्या अवघ्या दहाव्या अकराव्या वर्षी सभोवतालची परिस्थिती पाहून या बालकाने आपल्या आईला चिंता करितो विश्वाची असे उत्तर दिले. आणि सभोतालची परिस्थिती पाहून व्यथित झालेला हा नारायण वयाच्या अवघ्या बाराव्या वर्षी लग्नमंडपातून पळ काढता झाला. पुढे नाशिक येथील टाकळीच्या शांत निसर्गरम्य परिसरात गोदाकाठी त्यांनी बारा वर्षे तपश्चर्या करून आपल्या आयुष्यातील पुढील कार्याच्या दृष्टीने पायाभरणी केली. या काळात त्यांनी अनेक ग्रंथांचे अध्ययन केले. गायत्री पुरश्चरण व श्रीराम मंत्राचा तेरा कोटी जप केला. तसेच सूर्यनमस्कार इ. च्या माध्यमातून आपला शारीरिक, मानसिक व बौद्धिक विकास साधून घेतला. **(क्रमशः)**




## दासबोध स्तवन

उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

## शिष्यलक्षण

**ज्योतिर्मय साहित्य**

नमस्कार

मित्रांनो आपण आता तिसऱ्या समासाचा ओवीबद्ध अभ्यास करू या.


आपण आतापर्यंत गुरू कसा असावा.हे पाहिले पण शिष्य पण गुरू वर श्रद्धा असलेल मिळणे फार भाग्याचे आहे. अगदी रामायण, महाभारत काळा पासून गुरूशिष्य जोडी कशी करावी सते हे आपण पाहिले आहे. संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांनी आपल्या वडील बंधूंना गुरू केले. आजच्या काळाचा विचार करता प्रत्येक घरात अशी भावाभावांची ''गुरूशिष्याची'' जोडी तयार व्हायला हवी. भाऊबहिणींची झाली तरी हरकत नाही. माझ्या सांगण्याचा ऊद्देश असा की आपल्या घरात देखील ''गुरूशिष्य '' तयार होऊ शकतात. त्यासाठी संयमी विचार, परोपकारी आचारविचार, मनाचा मोठेपणा असणे गरजेचे आहे.

असे आदर्शवत् वातावरण ज्या घरात असेल तिथे समर्थाचे विचार नक्कीच पटतील. म्हणून दासबोधाचा अभ्यास कराव असे मला वाटते.म्हणून आदर्शाचा पाया घरात असणे गरजेचे आहे. कारण चार भिंती म्हणजे घर नाही तर सुसंस्कृत माणसे घरात असणे म्हणजे घरहोय.

परमार्थ जीवनात सद्गुरू व शिष्य ही एकाच संबधांची दोन टोके आहेत. सत्वगुणी गुरू व सत्वगुणी शिष्य मिळाला की परमार्थाला पूर येतो. समर्थाचा शिष्य कल्याण स्वामी यानांच अंबाजी असेही म्हणतात. हे दोघे एकमेकांना भेटले व परमार्थाचे सार्थक झाले असे दोघांनाही वाटले असणार. सत्वगुणी शिष्य बनवण्यासाठी गुरूना खुप कष्ट करावे लागतात. कसे ते आता पहा.

***

## साधनांनी जे साधत नाही ते संतसहवासाने साधते.



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

**ज्योतिर्मय साहित्य**

अवतारी संत आणि इतर संत यांच्यामध्ये फरक असतो. अवतारी संत हे ज्ञानेश्वर महाराजांसारखे किंवा समर्थांसारखे असतात. ते आपण होऊन येतात, आणि आपले काम झाले की जातात; मग ते राहात नाहीत. संतांनी जगातली राज्ये मिळविली नाहीत. पण त्यांनी स्वत:वर राज्य केले. चमत्कार करणे हे संतलक्षण नव्हे. चमत्कार सहजगत्या होतील तर होवोत, चमत्कार दाखवावा म्हणून संत चमत्कार करीत नाहीत. संतांची निंदा किंवा अपमान करू नये. त्यांची परीक्षाही पाहू नये. कोणाचेही वाईट चिंतू नये. दुसऱ्याचे हित करावे, हितच चिंतावे. उत्तम हित नामावाचून अन्य कशातही नाही. म्हणून अखंड भगवन्नाम जपणे ही संतसंगतच आहे. सद्विचार ही एक सत्संगतच आहे. ध्यान, स्मरण, मनन आणि सद्ग्रंथवाचन यांमुळे संतांची गाठ पडून त्यांच्याशी समागम होणे शक्य होईल.

संतसमागमात राहून विषय मागणे हे समागमाचे रहस्य नाही. एकुलत्या एका मुलाने अफूच्या गोळीसाठी हट्ट धरला, तर आई त्याला ती गोळी देईल का ? जर तिने ती दिली, तर ती खरी आईच नव्हे. त्याप्रमाणे, जो विषयाचे प्रेम देईल तो खरा संत नव्हे. संताला विषयाचे प्रेम असत नाही. इतकेच नव्हे, तर त्याचा माणूस विषयात राहिला तर त्याच्या हृदयाला पीळ पडतो. कुत्रा हाड चघळीत असताना आपल्याच तोंडातले रक्त पिऊन, ते त्या हाडातून येते आहे असे समजतो आणि शेवटी त्यातच मरतो. हे पाहून जितके वाईट वाटेल त्याच्या दसपट, नव्हे अनेकपट, आपण विषयमग्न असलेले पाहून संतांना वाईट वाटते.

संतांनी खरे भगवंताला जाणले. जिज्ञासू शिष्य भेटला तर संताला आपले स्वत:चे सार्थक झाले असे वाटते. साधनांनी जे साधत नाही ते संताच्या सहवासात राहिल्याने साधते. मनुष्य जितका नि:स्वार्थी तितकी त्याची भाषा व्यापक असते. तुमच्या–आमच्या घरातले लोकसुद्धा आपले ऐकत नाहीत, पण संतांची वाणी सर्व जगावर परिणाम करते, कारण ती सर्वव्यापक असते. ती अत्यंत तळमळीची असते. याच अर्थाने श्रुती सनातन आहे. जगाचे कल्याण व्हावे म्हणून ऋषी बोलले, म्हणून त्या वाणीने जगाचे कल्याण व्हायचेच, आणि जगाचे कल्याण व्हावे असे वाटते तोपर्यंत ती वाणी राहायचीच.

आहे त्यात समाधान मानणे, कोणाचाही द्वेष–मत्सर न करणे, सर्व भगद्रूप मानणे, निरभिमान राहणे, सदोदित भगवन्नामस्मरण करणे, आणि संत, सज्जन, सद्गुरू यांच्याविषयी पूज्यभाव ठेवणे या गोष्टी आचरणात आणणे हाच परमार्थ. यांत कोणती गोष्ट अवघड किंवा खर्चाची आहे ? आम्ही निश्चयाने ती करीतच नाही म्हणून समाधान येत नाही. या गोष्टींप्रमाणे आचरण ठेवले तर समाधान येईलच.

प्रपंचात कसे वागावे हे संत शिकवितात आणि वागून दाखवितात.

***

## ॥ संत महात्म्य ॥

**लेखक - मधुकर बोरीकर**
**9403061886**

## संत ज्ञानेश्वर महाराज यांचा अभंग

**ज्योतिर्मय साहित्य**

ही अशी अज्ञानात असणारी व रोज प्रसवूनही रोज वांझ ठरणारी गाय कोणती हे तुम्ही सद्गुरूंना विचारा. कारण त्यांच्या चैतन्य मयी स्पर्शा शिवाय मन ब्रह्म स्थानात लीन होणार नाही. म्हणजेच मनाची उत्तम अवस्था प्राप्त होणार नाही. असे संकेत मनासाठी ज्ञानेश्वर माऊलींनी इथे दिले आहेत.

मनाच्या चंचल ते विषयी तुकाराम महाराज म्हणतात

मन माझे चपळ न राहे निश्चळ
घडी एकी पळ स्थिर नाही
आता तू उदास नव्हे नारायणा
धावे मजदिना गांजियले
धाव घाली पुढे इंद्रियाचे ओढी
केले तडातडी चीत माझे

विषयाकडे वळलेले मन आपणास कसे गांजून टाकते हे आपणास यातून कळते.

मनाविषयी निळोबा राय काय म्हणतात ते आता आपण पाहू

मन विश्रांती पावले
गुरु चरणी स्थिरावले
ज्ञानयुक्त होता मन
ब्रह्मभूत झाले जान
जिकडे जिकडे जाय मन
तिकडे तिकडे अधिष्ठान
निळा म्हणे मन
होऊनी ठेले उन्मन

इथेही आपणास विषयाकडे वळलेले मन दुःख देणारे तर ब्रह्मरूप झालेले मन हे सुख देणारे, महानंद देणारे व उन्मनी अवस्थेत गेलेले दिसून येते.

तुकाराम महाराज एका अभंगात म्हणतात

नको नको मना गुंतू माया जाळी
काळ आला जवळी ग्रासावया
काळाचीए उडी पडेल बा जेव्हा
सोडविना तेव्हा मायबाप

विषयात अडकलेले मन हे माया जाळात अडकलेले आहे तिथे त्याला गुंतू देऊ नकोस तर ते ब्रह्मरूप कर आत्म्याकडे वळव कारण केव्हाही काळ ग्रासेल असेच तुकाराम महाराज सांगतात.

समर्थ रामदास स्वामी मनाविषयी काय म्हणतात तेही आपण पाहू

मना पाप संकल्प सोडून द्यावा
मना सत्य संकल्प जीवि धरावा
मना कल्पना ते नको विषयाची
विकारी घडे हो जनी सर्व ची ची

विषयात अडकलेले मन हे पाप संकल्प करणारे असते तर सत्य संकल्प हा केवळ आत्म्यात लीन होणारे मनच करू शकते. ते करावे. मनात विषयांची कल्पना करू नये. कारण त्यामुळे विकार ग्रस्त मन होते. असेच रामदास स्वामी हे सांगतात.

संत कबीर म्हणतात कबीरा मन निर्मल करे जैसे गंगाका नीर पाछे पाछे हरी फिरे कहत कबीर कबीर मनातील विकारांचा मळ काढून मन हे गंगेच्या पाण्या सारखे निर्मळ करायला हवे. त्यासाठीची साधना करायला हवी. असे केले तर तुम्हाला परमेश्वराच्या पाठीमागे लागण्याची गरज नाही, तर उलट तोच तुमच्या पाठीमागे लागेल. असे कबीर म्हणतात.

आपले मन स्वाभाविकपणे विषयाकडे वळलेले असते. यात सतत नवनवीन कल्पना चे उन्मेश भरून येतात. इच्छा आकांक्षा जन्म घेतात व म्हणूनच असे मन हे अल्पजीवी सुख व दीर्घकाळ दुःख देणारेच ठरते या अल्पजीवी सुखाकडून शाश्वत सुखाकडे जायचे असेल तर मनाचा फेर उलट करून आत्म्याकडे वळवावा लागेल. आणि यासाठी सद्गुरुला शरण जाऊन त्यांच्या सानिध्यात कठोर साधना ही करावी लागेल. अशी साधना आपण करावी असेच संकेत ज्ञानेश्वर माऊली या अभंगातून आपणास देत आहेत.

जीवनाचे ध्येयच मुळी दुःखाची निवृत्ती व सुखाचा शाश्वत लाभ हेच आहे दुःखाचा त्याग होऊन सुखाचा लाभ कसा मिळावा याचा मूलमंत्र देणाऱ्या महान मानसोपचार तज्ञ संत श्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींच्या चरणावर विनम्र भावाने प्रणिपात करून हा भाग इथे संपवूया

निवृत्ती ज्ञानदेव सोपान मुक्ताबाई एकनाथ नामदेव तुकाराम
जय हरी माऊली



## ॥ निरूपण ॥

ह.भ.प. चंद्रहास शास्त्री सोनपेठकर

**ज्योतिर्मय साहित्य**

२. अंबाबाईस आवाहन

अंबे इतुके करावे। माझिया कथेसी यावे।।
आसनावरी बसावे। मानपान सारे घ्यावे।।
नमितो मी मनोभावे। मजमुखे त्वा वदावे।।
कथाप्रसंग बरवे। नवरसा ते साधावे।।
माधुर्य स्वयेची यावे। अखंडित ते असावे।
भावडोळां तू दिसावे। तुझे स्मरण होआवे।।
लतामंडप सजावे। भक्तीचे झरे वहावे।
शब्दधनु मज द्यावे। कल्पांती ते न सरावे।।
स्वरोद्यान गे फुलावे। शब्देविण संवादावे।
प्रसादासी सर्वे यावे। मनोरथ पूर्ण व्हावे।।
याचकांनी संतोषावे। वंचकांनी दूर जावे।
भाविकांनी नाम घ्यावे। कथागंधे दर्वळावे।।
जीवशिवे अभेदावे। उदो उदो ते करावे।
चन्द्रहास विनवे गे। रसवन्ती तू वसावे।।



## आरोग्य संजीवनी

## इन्स्टंट नूडल्स सतत खाल्ल्याने पचन बिघडते

**ज्योतिर्मय साहित्य**

नूडल्स म्हणजे अनेकांच्या अतिशय आवडीचा आणि जिव्हाळ्याचा विषय. अगदी २ मिनीटांत होणारे आणि पोटभरीचे असे हे नूडल्स काही जण नियमित खातात. मोठमोठ्या कंपन्याही त्याची आकर्षक पद्धतीने जाहिरात करतात आणि आपले उत्पादन खरेदी करण्यास ग्राहकांना भरीस पाडतात. मॅगीसारखे नूडल्स तर अगदी लहान मुलांपासून मोठ्यांपर्यंत सगळेच जण आवडीने खातात. यामध्ये चीज, भाज्या, बटर असे घालून याची चव आणखी वाढवली जाते. तर चायनिज पदार्थ आवडणारेही आपल्या आजुबाजूला असंख्य जण असतात आणि हे लोक आवडीने शेजवान नूडल्स किंवा तत्सम वेगवेगळ्या फ्लेवरचे नूडल्स खातात. मात्र हे नूडल्स एकतर मैद्यापासून तयार झालेले असतात आणि त्यामध्ये इतरही हानिकारक घटक असल्याने ते आरोग्यासाठी म्हणावे तितके फायदेशीर नसतात. त्यामुळे नूडल्स खाणे टाळलेले केव्हाही चांगले.

नूडल्स खाणे का धोक्याचे असते याविषयी..

१. सोडीयमचे जास्त प्रमाण...

नूडल्समध्ये सोडीयमचे प्रमाण जास्त असते. यामुळे रक्तदाब वाढण्याची शक्यता असते. रक्तदाब वाढला की त्याचा हृदय आणि इतर अवयवांवर परीणाम होतो आणि परीणामी शरीराचे कार्य बिघडते.

२. प्रिझर्व्हेटीव्हचे प्रमाण जास्त...

फळं, भाज्या, दूध, डाळी, धान्य यांसारख्या नैसर्गिक पदार्थांचा आहारात समावेश असायला हवा असे वारंवार सांगण्यात येते. पॅकेट फूड म्हणजेच प्रिझर्वे टीव्ह असणारे पदार्थ शक्य तितके टाळायला हवेत असे सांगितले जात असताना आपण आहारात जास्तीत जास्त पॅकेट फूडचा समावेश करतो. मॅगी किंवा नूडल्स दिर्घ काळ टिकावेत यासाठी त्यामध्येही प्रिझर्वेटीव्ह जास्त प्रमाणात घालण्यात येतात. ते आरोग्यासाठी चांगले नसल्याने शक्यतो टाळायला हवेत.

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी–चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

३. अनावश्यक फॅटचे प्रमाण जास्त...

आपल्याला अन्नातून चांगले फॅटस आणि वाईट फॅटस असे २ प्रकारेच फॅटस मिळतात. नूडल्समध्ये वाईट प्रकारच्या फॅटसचे प्रमाण जास्त असते. त्यामुळे कोलेस्टेरॉलची पातळी वाढण्याची शक्यता असते. कोलेस्टेरॉल वाढले तर हृदयरोगाचा त्रास होऊ शकतो.

४. मेटाबॉलिक समस्या...

नूडल्समुळे रक्तातील साखरेचे प्रमाण वाढणे, वजन वाढणे, रक्तदाब वाढणे अशा समस्या उद्भवतात. या समस्या आरोग्यासाठी धोकादायक असल्याने शक्यतो आहारात नूडल्ससारखे पदार्थ टाळलेले केव्हाही चांगले.

५. पोषक घटकांची कमतरता...

नूडल्समध्ये शरीराला आवश्यक असणारे विशेष कोणतेच घटक नसतात. यामध्ये कॅलरीजचे प्रमाण जास्त असते, मात्र यात प्रोटीन, फायबर, व्हिटॅमिन्स, खनिजे यांचे प्रमाण खूपच कमी असते. त्यामुळे हे खाऊन शरीराला काहीच फायदा होत नसल्याने आहारात या घटकांचा समावेश टाळलेला चांगला.

## ॥ श्री राम कथा ॥




वक्ते : आदरणीय श्री चैतन्य महाराज देगलूरकर

**ज्योतिर्मय साहित्य**

त्यांनी १४००० राक्षसाची फौज आणली. रामाने एकट्याने सर्वांना मारले. खर, दूषण यांना मारले. हा पराक्रम पाहून शुर्पणखा रावणा कडे गेली. खोटे, नाटे सांगितले. रावणाला यावर विश्वास बसला नाही. ती म्हणे हे सोड पण रामा बरोबर जी स्त्री आहे ती खूप सुंदर आहे. ती माणसाकडे राहण्याच्या साठी जन्मलीच नाही.रावण म्हणतो अगं मंदोदरी किती सुंदर आहे. ती म्हणे सीतेला एकदा पहायला काय हरकत आहे ? इथेच रावण फसला. रावणाचे मनात आता विचार सुरू झाला.अकंपनाने रामाचे शौर्य त्यास सांगितले होते. एकट्या राजांनी १४००० राक्षस मारले. महाबलाढ्य खरं दुषन यांना मारले हे त्याने रावणास सांगितले. राम आपणासही मारेल असे वाटून तो थोडा घाबरला. तो त्याचा मामा मारीच यांचे कडे गेला. तो म्हणे हा वेडे पण सोड.असे करणे तुझ्या प्रतिष्ठेला शोभणारे नाही.हा अधर्म आहे. पुन्हा शुर्पणखेने त्याचे कान भरले.पुन्हा रावण हट्टाला पेटला.रावण म्हणे तू माझे ऐक.


**कथा ऐकता ऐकता धावते संकलन**
**मधुकर बोरीकर, 9403061886**

रावण ऐकत नाही हे पाहून मारीच म्हणाला, तुझे वाईट दिवस आलेले दिसतात. या कामात मी मरेन पण हृदयात नीती घेऊन मरेन.

मारीच्याने सुवर्ण मुगाचे रूप घेतले. ते सीते च्याजवळ बागडायला लागले. प्रीतीला या गोंडस सुवर्णमृगाचा मोह झाला. त्याला आपण सांभाळू. त्याच्याशी खेळू तुम्ही त्यास पकडा असे ती राज्यांना म्हणाली.

(क्रमशः)

# डॉ. निर्मोही फडके यांच्या लेखनातील काळभान




**ज्योतिर्मय साहित्य**


ललित लेखन हा आत्मनिष्ठ असा प्रकार आहे. त्याच्या त्रिज्या लोकभावना व संभावनांमध्ये गुंतलेल्या असतात. आपण त्या संवादांतून पडताळत आपल्या आयुष्याशी, सभोवतालाशी आस्थेने जोडत सौंदर्यपूर्ण करीत असतो. परंतु अरिंदमला जोडलेली स्थित्यंतरांची धग अंतर्मुख करणारी होती.

त्या लेखनाशी जोडलेला काळ, त्यातील विदारक सत्य जीवनाचे भान आणून देणारे नक्कीच होते. या सगळ्या पार्श्वभूमीवर कवितेत शब्दांचा खेळ करण्यापेक्षा कलाकृतीतून प्रकट झालेल्या जीवनजाणिवांचे महत्त्वाचे चिंतन या लेखनातून आलेले आहे. त्यात प्रामुख्याने आवडलेल्या, अभ्यासलेल्या लेखक कवी आणि त्यांच्या साहित्याचा समकालीन वास्तवात केलेला विचार आहे.

निर्मोही म्हणते तसे, अरिंदम हे पुस्तक अशा शोधयात्रेतून लिहिलेल्या, तर कधी उत्स्फूर्तपणे सुचलेल्या मुक्त-बंदिस्त अशा निबंधांचा संग्रह आहे. असे असले तरी या लेखांमधील उत्स्फूर्ततेची भावना ललित गद्याच्या अवकाशात तर, त्यातील चिंतनगर्भता निबंध वाङ्.मयाच्या कक्षेत आपले स्थान निश्चित करणारी आहे, असे मला प्रकर्षाने वाटते आहे. त्या दृष्टीने आपण या लेखनाला ललितगद्यापेक्षा ललितनिबंध असे म्हटले तरी काहीच वावगे ठरणार नाही.

शेवटी कोणत्याही मार्गाने चांगल्या साहित्यकृतीचे लेखन, वाचन आणि आस्वादन ह्याची प्रक्रिया जीवनाकडे जाणारी असली पाहिजे. आपल्या समकालीन वास्तवाचे प्रतिबिंब त्यात असावे - दिसावे लागते.

त्या दृष्टीने आपल्या लेखन - चिंतनासाठी निवडलेले लेखक - कवी म्हणून ज्ञानेश्वर, तुकाराम, चक्रधर, संतसाहित्यासह रुबाया, पुलं, विंदा करंदीकर, आरती प्रभू, भालचंद्र नेमाडे यांच्या आजच्या असण्याचा एक विस्तार



**- दा.गो. काळे. (समीक्षक)**

त्यांनी मांडलेला आहे.

या संग्रहाचे शीर्षकही अर्थपूर्ण आहे. आपण भोगलेल्या, अनुभवलेल्या काळाला समजून घेणारे आहे. खरे तर आपण या कोरोनाच्या दुष्टचक्रात आपल्यासह सगळ्यांना जगवायला शिकलो आहोत. तेथे कोणत्याही प्रकारच्या शत्रुत्वाची भावना जन्म घेणारी नाही. आपला सभोवताल आणि समष्टीसह जगणे महत्त्वाचे ठरले होते. त्याच काळात आपण आत्मनिर्भरही झालेले पाहत होतो. त्यानुषंगाने साहित्यातील आत्मनिर्भरतेची नवलाई या लेखनातील निरीक्षणे अत्यंत महत्त्वाची आहेत. त्या काळात आपल्या लेखन-व्यवहारात चांगली - वाईट अशी झालेली स्थित्यंतरे खूप तार्किक आणि तटस्थतेने मांडलेली आहेत, आणि त्या काळात माणसाचे असणेही आले आहे.

माणसाच्या माणूसपणाच्या व्यवच्छेदक लक्षणांपैकी स्पर्श हे एक महत्त्वाचे लक्षण. जिथे शब्द थिटे पडतात तिथे स्पर्श केवढे काही सांगून जातो. ह्या स्पर्शावरच बंधने आली. जगरहाटीचे आयाम बदलले. जगण्याची व्याख्या बदलली. श्वासनिःश्वास घ्यायचे-सोडायचे ह्यावरच निर्बंध आले, तिथे बाकी गोष्टींची काय कथा ? असा एक सवाल त्यांनी मानवी अस्तित्वाच्या परिघात विचारला आहे. आपण अज्ञाताच्या, नियतीच्या प्रदेशात वावरत असतो. माणसाला सावध करण्याचे कोणतेही शास्त्र-संकेत आणि योग नाहीत. हा सगळा निसर्ग आणि पर्यावरणातील घटितांचा अगम्य असा खेळ आहे. हे पुन्हा कोरोना काळाने आपल्याला दाखविले आहे असे म्हणता येते. **(क्रमशः)**

# सच्चे रंगकर्मी स्वर्गीय जयंत सावरकर!



**ज्योतिर्मय साहित्य**

मराठी चित्रपट आणि नाट्य सृष्टीतील जेष्ठ अभिनेते जयंत सावरकर यांचा आज दुसरा स्मृतिदिन. बरोबर एक वर्षापूर्वी म्हणजे २४ जुलै २०२३ रोजी त्यांचे वृद्धपकाळाने वयाच्या ८७ व्या वर्षी निधन झाले होते. जवळपास पाच दशकांहून अधिक काळ रंगभूमीवर आपल्या अभिनयाचे रंग भरणाऱ्या जयंत सावरकर यांच्या निधनाने मराठी रंगभूमीची मोठी हानी झाली. त्यांच्या निधनाने रंगभूमीची अविरत सेवा करणारा सच्चा रंगकर्मी काळाच्या पडद्याआड गेला. ३ मे १९३६ रोजी रत्नागिरी जिल्ह्यातील गुहागर तालुक्यात जन्मलेले जयंत सावरकर हे नोकरीसाठी मुंबईत आले. काही काळ त्यांनी मुंबईत नोकरीही केली मात्र अभिनयाचे बाळकडू पिलेल्या जयंत सावरकर यांचे मन नोकरीत रमले नाही. नोकरी सोडून ते नाटकात काम करू लागले. नोकरी सोडून त्यांनी नाटकात काम करणे हे त्यांच्या सासऱ्यांना आवडले नाही. जयंत सावरकर मात्र अभिनय करण्यावर ठाम राहिले. रंगभूमीवर त्यांना जी भूमिका मिळत गेली ती त्यांनी निष्ठेने पूर्ण केली. सुरवातीचे काही वर्ष तर त्यांनी बॅक स्टेज आर्टिस्ट म्हणूनच काम केले मात्र आपल्यालाही आपल्या क्षमतेप्रमाणे नाटकात अभिनय करण्याची संधी मिळेल असा विश्वास त्यांना होता याच विश्वासाच्या जोरावर त्यांना भूमिका मिळत गेल्या. आपल्याला मिळणाऱ्या भूमिकांची लांबी किती मोठी आहे हे त्यांनी कधीही पाहिले नाही. जयंतराव भूमिकेच्या लांबीपेक्षा भूमिकेची रुंदी पाहत म्हणूनच त्यांना काही नाटकात छोट्या भूमिका मिळाल्या मात्र या छोट्या भूमिकेतही त्यांनी स्वतःच्या अभिनयाची छाप सोडली त्यामुळे लवकरच मराठी रांगभूमिवरील एक प्रख्यात अभिनेते म्हणून ओळखले जाऊ लागले. पुढे त्यांना अनेक नाटकात मुख्य भूमिका मिळाल्या त्या भूमिकांचे त्यांनी सोने केले. एकच प्याला मधील तळीराम, तुझं आहे तुझ्यापाशी मधील आचार्य, व्यक्ती आणि वल्ली मधील अंतु बर्वा आणि हरितात्या या त्यांनी केलेल्या भूमिका अजरामर ठरल्या. जुन्या काळातील मामा पेंडसे, केशवराव दाते, दत्ताराम यांच्यापासून ते आजच्या काळातील चंद्रकांत कुलकर्णी, मंगेश कदम यासारख्या सर्वच दिग्दर्शकांच्या दिग्दर्शनात त्यांनी काम केले. त्यांनी अभिनय केलेले सौजण्याची ऐसीतैशी, टिळक - आगरकर, ययाती - देवयानी, सूर्यास्त ही नाटके खूप गाजली जवळपास १०० हुन अधिक नाटकात भूमिका केलेल्या जयंतरावांनी ३० हुन अधिक मराठी आणि हिंदी चित्रपटात भूमिका केल्या आहेत. दूरचित्रवाणीवरील काही मालिकातही त्यांनी भूमिका केल्या आहे. नाटक, चित्रपट, मालिका अशा तिन्ही ठिकाणी आपल्या अभिनयाचे रंग भरणारे जयंतराव मात्र प्रेक्षकांना भावले ते नातकातच! सहज सोपा अभिनय करून प्रेक्षकांची मने जिंकण्याची त्यांची खासियत होती म्हणूनच त्यांचा अभिनय पाहताना हा माणूस आपल्या घरातीलच एक व्यक्ती असल्याचा भास प्रेक्षकांना होत असे. त्यांच्या अभिनय कलेसाठी त्यांना अनेक मानाचे पुरस्कारही मिळाले आहेत. अखिल भारतीय नाट्य परिषदेने त्यांना जीवनगौरव पुरस्कार देऊन गौरवले आहे. १९९७ साली झालेल्या अखिल भारतीय नाट्य संमेलनाचे अध्यक्षपदही त्यांनी भूषवले आहे. एक छोटा माणूस या नावाने त्यांचे आत्मचरित्र प्रसिद्ध झाले आहे. त्यांच्या निधनाने पाच दशकांहून काळ रंगभूमीची अविरत सेवा करणारा सच्चा रंगकर्मी काळाच्या पडद्याआड गेला आहे. जेष्ठ रंगकर्मी जयंत सावरकर यांना दुसऱ्या स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

**

**श्याम ठाणेदार
पुणे**

## फुलमाला....





गुलबक्षी..

सुबक लांब देठाचे
फुल दिसे सुकुमार
उन्हे उतरता खाली
कळी उमलते हळूवार

सुंदर रंगाची गुलबक्षी
खुलते हिरव्या पानी
गंध जरी नाही तिजला
वाहतात देवा चरणी..

सौ.माधुरी म.इनामदार, मिरज..





**विश्वास देशपांडे,**
चाळीसगाव
मो. ९४०३७४९९३२

## रवींद्रनाथ टागोर : वारसा आणि कार्य

**ज्योतिर्मय साहित्य**

### शांतिनिकेतन ते विश्वभारती

थोरांची चरित्रे, राष्ट्रप्रेम, सदाचार यासारख्या लहान मुलांच्या वयाला न पेलणाऱ्या गोष्टी त्यांनी आपल्या पाठ्यपुस्तकात ठेवल्याच नाहीत. या गोष्टींना त्यांचा विरोध होता अशातला भाग नव्हता परंतु मुलांना सहजपणे कसे शिकता येईल त्यांचे शिक्षण आनंददायी कसे होईल यावर त्यांचा भर होता. त्यांनी मुलांचे बालसृष्टीतील मित्र होऊन, त्यांच्या पातळीवर जाऊन या पाठ्यपुस्तकांची निर्मिती केली. या पाठ्यपुस्तकातील एक एक धडा म्हणजे सुंदर शब्दचित्रच आहे ! सभोवतालच्या जगाचे निरीक्षण करता करता मुले सहजपणे यातून शिकत जातात आणि आपण काही शिकतो आहोत याची जाणीव न होता सहज शिकत जातात हे या पाठ्यपुस्तकांचे वैशिष्ट्य आहे. यातील पाठ गाता येतात, पाहता येतात, ऐकता येतात आणि अनुभवता येतात.

शांतिनिकेतनमध्ये त्यावेळी प्रख्यात चित्रकार नंदलाल बोस विद्यार्थ्यांना चित्रकला शिकवत. त्यांच्या सुंदर चित्रांनी ही पुस्तके नटलेली आहेत. रवींद्रनाथांचे शब्द आणि नंदलाल बोस यांची बोलकी चित्रे यांचा सुरेख संगम या पाठ्यपुस्तकांमध्ये झाला आहे. पु ल देशपांडे यांनी शांतिनिकेतनमध्ये काही काळ वास्तव्य केले होते. या पुस्तकांबद्दल बोलताना ते म्हणतात, ‘‘माझ्या शांतीनिकेतन मधल्या वास्तव्यात या सहजपाठांनी माझे हरवलेले बालपण मला परत आणून दिले. ज्याला म्हणून बंगाली शिकायचे असेल त्याने सहजपाठाचे हे चार भाग पुन्हा पुन्हा वाचावेत. बंगाली भाषेच्या अंगाखांद्यावर खेळल्यासारखे वाटेल. सहजपाठ म्हणजे गुरुदेवांचे बंगालवर असलेले महान उपकार ! ‘‘

बंगालमधील खेड्यात राहणारी मुले मुली डोळ्यासमोर ठेवूनच रवींद्रनाथांनी हे सहजपाठ लिहिले. सकाळचे वर्णन ते किती सुंदर करतात ते पहा

आलो हॉय - गॅलॉ भोय, चारी दिक झिक मिक -
( उजेड होतो, भय जाते, चारी बाजूला झुंजूमुंजू होते )

हे सगळे मुले गात गात आनंदाने म्हणू शकतात. सकाळ झाल्यानंतर गावातील माणसे कशी कामाला लागली याचेही चित्र सोप्या शब्दातून ते मुलांसमोर उभं करतात

पाडे पेरू हरी हर
मधू राय बांधे घर
होडी हाके पातू पाल
धान्य आणे जयलाल
धरे सुकाणू दीनानाथ
अविनाश रांधे भात.

आपल्याकडे शाळेतील मुलांना कविता पाठ केल्या की परीक्षेला मार्क मिळतात एवढेच ठाऊक. परंतु त्यातून मिळणाऱ्या आनंदाला ही मुले पारखी होतात. कविता या चालीवर सुंदर गाता येतात, त्या म्हणताना नाचता येते त्या गात गात भाषा शिकता येते, याची जाणीवच आमच्याकडे करून दिली गेली नाही. बंगालमधील मुले खरोखरच भाग्यवान म्हणावी लागतील कारण रवींद्रनाथांनी त्यांना शेकडो सुंदर गाणी रचून दिली. त्या गीतांना सुंदर चाली लावल्या गेल्या. बंगाली माणसाचे बालपण या गीतांनीच समृद्ध झाले. **(क्रमशः)**

## ऑनलाईन औषधोपचार



आता सर्वकाही झाले आहे ऑनलाईन मग आजारपणात पण घरबसल्या औषधोपचार घ्या, कुठेही जाण्याची गरज नाही, वेळ व पैसा वाचवा 100 % खात्रीशीर इलाज, गुप्तरोग, शारीरिक थकवा, बऱ्याच गोष्टी कोणालाही सांगण्यास लाज वाटते अशा वेळेस फक्त फोनवर तुम्ही तुमचा आजार सांगू शकता व त्यावर आयुर्वेदिक पद्धतीने हमाखास उपाय केला जाईल, पोस्टाने औषधं पाठविल्या जातील, प्रसिद्ध आयुर्वेदाचार्य डॉ. शेख ए एच, 37 वर्षाचा अनुभव, 200 पेक्षा अधिक पुरस्कार प्राप्त, 2 लाखांपेक्षा अधिक विविध लैंगिक समस्यग्रस्त रुग्णांवर यशस्वी उपचार, आतापर्यंत ५ ऑनररी डॉक्टरेटच्या पदव्या देऊन विविध संस्थांनी त्यांना सन्मानित केलेले आहे. त्यांच्या या कार्याची नोंद लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, ओयासिक बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, एशियन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, हुज-हू-इन एशिया रेकॉर्डस् मध्ये विक्रमी नोंद झालेली आहे. सेक्स विषयक कोणताही प्रॉब्लेम असो फक्त एकदा फोन करा व मार्गदर्शन घ्या. व तुमचे प्रश्न सोडवा.

Dr Shaikh A H - 98606 99906



## इंदापूरी निखारे

### आदर्श घोटाळा...



**ज्योतिर्मय साहित्य**

तो शाळेतून घरी आला, थोडावेळ कॉलनी मध्ये खेळायला गेला. हातपाय धुऊन आई, बाबा, भाऊ, बहीण जेवायला बसले. बाबा सगळ्यांना अभ्यास विषयी बोलत होते आणि इतर दिवसभराच्या हसत खेळत गप्पा सुरु होत्या, जेवण पण झाले होते. होमवर्क करण्यासाठी तो आईला म्हणाला आज खूप अभ्यास आहे काहीतरी खायला लागेल आणि तेव्हढ्यात दारावरची बेल वाजली...

त्याने दार उघडले. समोर गुरुजी होते. हे गुरुजी सर्व विद्यार्थ्यांचे आवडते गुरुजी! या सर, बसा ना सर.त्याने बाबांना हाक मारली, बाबा माझे सर आले आहेत.त्याचे शाळेचे शेवटचे वर्ष होते आणि हे सर शाळेत आम्हा सर्वांना अभ्यास तर होताच पण कॉलेज मध्ये जाण्याची पुर्व तयारीचा अभ्यास पण शिकवत होते, त्यांचे शाळाबाह्य शिक्षण खूप अभ्यासपूर्ण असायचे म्हणून सर्वांचेच आवडते...

अजून एक गंमत म्हणजे त्यांनी एका पोरीला पळवून लग्न केले होते आणि तेही दुसऱ्या जातीच्या मुलीबरोबर. एकदा शाळेच्या मधल्या सुट्टीत अचानक शाळेजवळ असलेल्या चहाच्या टपरीवर आले, त्यांना पाहताच काही मुले सिगरेट पीत होते त्यांनी लगेचच फेकून दिल्या. तेव्हा आमचे आदर्श, लाडके सर म्हणाले अरे कशाला फेकून दिल्या? त्यामुळे त्यांच्या विषयी खूप आदर वाढला होता...

तर असे आवडते सर घरी आले त्यामुळे खूप आनंदून गेला, मग चहा पिता पिता बाबांबरोबर गप्पा मारत बसले होते. सर निघाले आणि तो त्यांना सोडायला गेला. तुला काही सांगायचे आहे पण तू कोणाला सांगू नको. तो ह म्हणाला...

सर म्हणाले अरे तुझ्याकडे ५ रुपये असतील तर दे. काय झाले की बायकोला सिनेमा पाहायचा आहे आणि पगार अजून आठ दिवसांनी म्हणून.थांबा सर, मी बाबांना सांगतो. त्याने बाबांकडून सरांना १५ रुपये पाहिजेत. देता येतील का असे विचारत आहेत. बाबांनी १५ रुपये दिले, त्यातील १० रुपये सरांना दिले. सर खूप खूष झाले आणि विद्यार्थी पण...

पुढील काही काळात हे आदर्श सर आणि त्यांचा आदर्श विद्यार्थी उच्च शिक्षण घेत घेत यशस्वी झाले हे न सांगता पण लक्षात आले असेलच...




ज्योतिर्मय
साहित्याचे विद्यापीठ



## आठवणीतले बालपण


मित्रांनो, प्रत्येकाच्या आयुष्यात बालपणीचे विशेष महत्व असते, रम्य ते बालपण, खरंच बालपणीसारखी मज्जा परत कधीच येत नाही आता ते दिवस आठवले तरी मन खूप प्रसन्न होतं, तर आपण सर्वजण परत एकदा त्या बालपणीच्या विश्वात जाऊया, त्या आठवणींना एकदा उजाळा देऊयात ज्योतिर्मयच्या माध्यमातून. मग लिहायला सुरुवात करा व पटकन पाठवा मला 7743918559 या व्हाट्सअप नंबरवर
- संजय व्यापारी, संपादक,
ज्योतिर्मय साहित्याचे विद्यापीठ.

# संत सावता महाराजांचा मानसोपचार

ज्योतिर्मय साहित्य

आज संत शिरोमणी सावता महाराजांचा ७३० वा समाधी सोहळा !सावता महाराज हे आरणचे.धन्य ते आरण रत्नांची खाणी।जन्मला निधान सावता तो।। असे प्रेमाचे सागर असणारे सावता महाराज कांदा ,मुळा,भाजीत विठाई पाहतात.काम सोडा अन् राम म्हणा असे वारकरी संतांनी कधीच सांगीतले नाही.आपले कर्म हाच स्वधर्म त्यांनी मानला.तेराव्या शतकात मानसिक आरोग्यावर विशेषतः दोन संतांनी मूलगामी विचार मांडलेत.त्यात ड्रिप्रेशनमध्ये जाऊन ताटी बंद करुन बसलेल्या ज्ञानदेवांना उपदेश करणाऱ्या संत मुक्ताई यांचे ताटीचे अभंग हे मनोविश्लेषणवादाच्या आधारे अभ्यासले की,मुक्ताईंचे मनोवैज्ञानिक व्यक्तीमत्व दृग्गोचर होते.तसेच समकालात संत सावता माळी हे एक त्यांचे सहकारी होत.सावता माळी यांचे मोजकेच अभंग आजमितीला उपलब्ध आहेत.त्यातील

*समयासी सादर व्हावे। देव ठेवील तैसे रहावे।।* हा अभंग आजही डिप्रेशनमध्ये जाणाऱ्या अनेक मनोरुग्णांसाठी दिशादर्शक आहेच पण उपचारात्मक आहे.माणूस भूतकाळ आणि



भविष्यातील कल्पना यात रमत बसतो.साक्षीभावाने पाहत नाही.मुळात देह मी नाही ही वेदांताची शिकवण अंगी न बाणल्याने दुःख भोगायची पाळी येते.देह व देहसंबंधी यात माणूस गुंतून पडतो व सुखदुःखाच्या हिंदोळ्यावर झोके घेत राहतो.पण मी स्वतः मन,बुध्दी,चित्त,देह ,नसून स्वतः शिवोऽहं आहोत ही भावनाच आरुढ होत नाही. आनंदाचा कंद असणाऱ्या ब्रम्हाचा अंश असणाऱ्या माझ्या आत्म्याला दुःख येऊच शकत नाही हे न समजल्यामुळे माणूस दुःखी होतो.अशा दुःखीताला सावता महाराज उपदेश करतात की,


''समयासी सादर व्हावें । देव ठेविले तैसें रहावें ।।१।।

कोणे दिवशीं बसून हत्तीवर । कोणे दिवशीं पालखी सुभेदार । कोणे दिवशीं पायांचा चाकर । चालून जावें ।।२।।

कोणे दिवशीं बसून याचीं मन । कोणें दिवशीं घरांत नाहीं धान्य । कोणे दिवशीं द्रव्याचें सांठवण । कोठें साठवावें ।।३।।

कोणे दिवशीं यम येती चालून । कोणे दिवशी प्राण जाती घेऊन । कोणे दिवशीं स्मशानीं जाऊन । एकटें रहावें ।।४।।

कोणे दिवशीं होईल सद्गुरूची कृपा । कोणे दिवशीं चुकती जन्माच्या खेपा । कोणें दिवशीं सावत्याच्या बापा । दर्शन द्यावें ।।५।।''




कधी तुझी हत्तीवर मिरवणूक निघेल तर कधी पायी चालावे लागेल.कधी पालखी सुभेदार सोबत असतील,कधी पंचपक्वान्न खायला मिळेल तर कधी घरात अन्नाचा कणही नसेल .म्हणून काळजी करत बसण्याचे कारण नाही.मनःशांती महत्वाची.असा मोलाचा उपदेश सावतोबांनी मनोरुग्णांनाच नाही तर सर्वांनाच मानसिक स्वास्थ्यासाठी केलाय.वाहिल्या उव्देग।दुःखचि केवळ।। हे तुकोबांनी यासाठीच सांगीतले आहे. म्हणून संतकवितेकडे केवळ भक्ती चळवळ म्हणून न पाहता ती एक वैचारीक चळवळ आहे हे लक्षात घ्यावे.




## कला-आनंद

ज्योतिर्मय साहित्य

नमस्कार रसिक हो-

माणसांच्या आयुष्याला, जगण्याला सुंदर, सार्थक आणि अर्थपूर्ण बनवण्यात विविध कला '' यांचा मोठा वाटा आहे. प्रत्येकाच्या व्यक्तित्वात ''एखादी कला नव्हे तर अनेक कला '' असणे यात आश्चर्य वाटण्यासारखे काही नाही.

अनेक कलांमध्ये पारंगत असणारा एखादा जो कलाकार असतोच, त्याप्रमाणे कलेची आवड असणारा, कलासक्त मनाचा व्यक्ती देखील ''दर्दी -कलाकार'' असतो. अशांची गर्दी कधीच नसते म्हणून आपली कला दर्दी रसिकांच्या समोर सादर करण्यात खरा आनंद मिळत असतो.

मित्र हो-

माझे आणि कलेचे एक जिव्हाळ्याचे नाते आहे.मी आर्टिस्ट नाहीये पण एक रसिक श्रोता, प्रेक्षक नक्कीच आहे.

मला सिनेमा पहाणे आवडते, जुने चित्रपट, त्यातील गाणी मी रेडिओवरून सतत ऐकतो, युट्युबवर ओल्ड इज गोल्ड चित्रपट पहातो यात कला-आनंद आहे. उत्कृष्ट फोटोग्राफी, सुंदर लोकेशन्स, मनस्पर्शी कथानक, उत्कट अभिनय, अर्थवाही संवाद, भावनिक गीतं, मधुर संगीत'', या सर्व कलांचा आविष्कार सिनेमात पाहण्यास मिळतो. आता या सगळ्यात लक्षणीय भर पडली आहे ती इंटरनेट वरील वेब-मुव्ही, वेब सिरीज यांची. या ओ टी टी ''माध्यमाने प्रेक्षकांना खिळवून ठेवले आहे, बांधून ठेवले आहे. ह्या पॉवरफुल माध्यमाने कलेचा आनंद जगभरातील रसिकांना भरभरून मिळतो आहे'' हे सर्वमान्य आहे.

मित्र हो - मी जुन्या पिढीचा प्रतिनिधी असलो तरी, नव्या पिढीच्या कलाविष्कार - उपक्रमांना मनापासून दाद देतो. नव्या मल्टीप्लेक्समध्ये अलिकडच्या काही वर्षात मी मराठी चित्रपट प्राधान्याने पाहिले आहेत . लाईव्ह म्युजिकल कार्यक्रम ''विशेष आवडीचे आहेत.आवर्जून हे ऐकतो, पहात असतो. थिएटरमध्ये जाऊन सिनेमा पाहण्याची बैठक क्षमता आता नाही. पण नाट्यगृहात जाऊन नाटकं पहाणे ''यात मनापासून रमतो.

साहित्य क्षेत्रात लेखक-कवी, बालसाहित्यिक, समीक्षक'' म्हणून सक्रिय असतांना इतर लेखकांची संगीत, संस्कृती, भाषा विषयक '',सामाजिक विषयावरची पुस्तके वाचतांना मला आपल्या संस्कृती, परंपरा, लोकजीवन, लोककला'' निसर्ग दर्शन '' यांचे समग्र दर्शन घडते. आपल्या सभोवताली असलेल्या कलापूर्ण सामाजिक -सार्वजनिक जीवनामुळे '' माझ्यातील मी- एक रसिक, कलासक्त ''होऊ शकलो, अशी माझी भावना आहे.


# भटक्या काव्यसंग्रह समाज मनाचा आरसा

ज्योतिर्मय साहित्य

कवी विजय कदम यांचा भटक्या काव्यसंग्रह हातात पडल्या पडल्या मला आकर्षित केले ते या काव्यसंग्रहाच्या मुखपृष्ठाने. मुखपृष्ठावरील वयोवृद्ध माणसाच्या भटकण्याचे चित्र बरेच काही सांगून जात होते. वृद्धाच्या चेहऱ्यावरील भाव हतबलता सर्व काही शब्दाविना जाणवत होती. आजूबाजूला माणसांची गर्दी असताना सुद्धा आयुष्याच्या संध्याकाळी स्वतःची वाट नव्याने शोधावी लागते आहे. समाजात वयोवृद्ध माणसाकडे केले जाणारे दुर्लक्ष या कवितेतून जाणवत होते. हा आपणांसमोर जिवंत मांडून ठेवलेला प्रश्नच आहे. याच आशावर आधारित कवी शहाजी कदम यांच्या हरपलेला बाप, अरे माणसा माणसा, घर सोडून गेलं पाखरू, बाप समजायला काळीज लागतं, हे या बाप नावाच्या माणसांच्या भावनांचे पदर उलघडणाऱ्या कविता आहेत. कवीचे लिहिते हात अनेक मानवी पदर संवेदनशीलपणे उलगडत राहतात.

स्त्री जाणीवांची उकल करणाऱ्या अनेक कविता या कविता संग्रहामध्ये वाचायला मिळाल्या. त्यामध्ये विटाळ ही कविता मनाला खूप भावली. या संदर्भाने स्त्रियांच्या नैसर्गिकबंधाला सामाजिकतेचे नियम का असावे असा प्रश्नच या कवीने कवितेतून मांडला आहे. जो की उघडपणे समाजासमोर मांडला जात नाही. बाई तू कुठे काय करतेस यातून स्त्री च महत्व विशद केले आहे. जगाचा पोशिंदा शेतकरी वर्षभर काबाडकष्ट करूनही त्याच्या मालाला भाव मिळत नाही रास्त हमीभाव या कवितेतून मांडले आहे. या कविता संग्रहामध्ये अनेक प्रकारच्या कविता आहेत. त्यामध्ये निसर्गाचे जतन करणाऱ्या वृक्षवल्ली आम्हा सोयरे, त्याबरोबर स्वजाणीवेच्या मेरी आवाज मेरी पहचान, शिवबाची आन, सुविचारांची पेरणी यासारख्या




कविता समाविष्ट आहेत. तारुण्याच्या वेलीवर झुलणाऱ्या नवयुवक युवतींसाठी अबोल प्रेम, नजरेची भाषा, ती आणि मी, जवानी यासारख्या कविता वाचायला मिळतात. या कवितासंग्रहातून कवीची एक बाब वैशिष्ट्यपूर्ण जाणवते ती म्हणजे कवीचे कवीचे चौफर निरीक्षण, संवेदनशील मन, कधी निसर्ग तर कधी मानवी भाव, शब्दात पकडून मांडण्याची कला. कवी विजय कदम यांच्या या कवितासंग्रहामध्ये एकूण ४२ कविता आहेत. त्या अंतर्मनाचा ठाव घेणाऱ्या आहेत. पण कवी म्हणतात या लिहिण्यामागे मी मात्र निमित्त होतो येथे कवीपणाचा मोठेपणा दिसून येतो. एकूणच भटक्या हा कवींचा पहिला काव्यसंग्रह असूनही तो वाचनीय व दर्जेदार असाच झाला आहे. प्रत्येकाच्या संग्रही असावा असाच हा काव्यसंग्रह आहे. कवी विजय कदम यांचे अभिनंदन व पुढील साहित्यिक वाटचालीसाठी खूप खूप शुभेच्छा.

# परतीच्या पाऊल खुणा...



ज्योतिर्मय साहित्य

मी कॅनडा मध्ये आले त्यावेळी इथली अतीव शांतता, स्वच्छता आणि रात्री नऊ वाजता होणारा सूर्यास्त सगळेच मला अचंबित करणारे होते.. जशी जशी या देशाची इथल्या राहणीमान आणि हवेची, इथल्या निसर्गाची माहिती होत गेली आणि नकळत मैत्रीही झाली. या सगळ्या बदलांना मी त्यांनाआणि त्यांनीही मला सहज सामावून घेतले. बघता बघता चार महिने कधी संपले हे कळलेही नाही.. आता परतीचे वेध लागले आणि कॅनडाच्या (मीसी सागा) निरोपाची वेळ आली.

किती बदलत जाते आपले आयुष्य... आणि किती वेगळी वळणेही लागतात ज्याची आपण कधी कल्पना ही केली नाहीत अशी. आता आमची जाण्याची वेळ जवळ येईल तसे इथल्या हवेत गारवा वाढला, मायनस मध्ये तापमान येऊ लागले. घरी गरम हवा असल्याने उबदार वाटत होते पण बाहेर जाणे कमी कमी होत गेले. एकटीने तर थंडीत बाहेर पडणे अशक्यच झाले. आता इथे उत्तरायण सुरू झाले. भारत आणि इथल्या वेळेत एक तासाचा फरक झाला. संध्याकाळी साडेचार वाजे पर्यंत असणारा सूर्य किरणांचा झळाळ पाच साडेपाच पर्यंत पूर्ण जातो आणि अंधार पडतो... आणि सहा वाजेपर्यंत तांबूस चंद्रकोर ही आभाळात दिसू लागते.

आम्हीं आलो त्यावेळी उन्हाळा असल्यामुळे सगळीकडे सुंदर फुलेच फुले बहरली होती. आणि सगळ्या हिरव्यागार वाटा आपल्या हिरवाईत सहज सामील करून घेत होत्या. नंतर पानगळीचे दिवस आले.. वेगाने बदलणारे झाडाचे विविध आणि मनमोहक रंग आणि त्याची प्रचंड पडणारी भूल न पडली तरच नवल. नंतर वाऱ्याने होणारी पानगळ त्याचा मखमली गालिचा, तर कधी झुळूक येताच होणारी पानांची सुरेख गरगर हे मी सगळेच खूप




जवळून आणि आनंदाने अनुभवले. जवळच असणारा आणि दूरवर वाहणारा हा झरा आणि त्याच्या अनेक पायवाटा पैकी काही सहज रुळलेल्या वाटा त्या जणू माझ्याच झाल्या होत्या. नाती बरोबर झऱ्यातल्या बदकांना ब्रेड घालणे, चिऊ ताईला तांदूळ दाणे घालून रस्त्यावर फिरणाऱ्या खारू ताई मागे पळणे.. लाल बेरी, काळ्या बेरीची झाडे शोधून काढणे.. दोघी मिळून सुंदर नाजूक गवत फुले विविध रंगाची गोळा करून आणणे हे सगळेच किती कधीही न अनुभवलेले वेगळे आणि सुंदर अनुभव होते. दिवसाच्या कुठल्याही प्रहरी या शांततेत आणि सौंदर्याची अनुभूती घेत मारलेली फेरी मला खूप ऊर्जा देत असे... आता या सगळ्याचा निरोप घ्यायची वेळ आल्यावर नकळत मन भावूक झाले. माणसासारखाच निसर्गही खूप काही सहज देऊन आपल्याला गुंतवून ठेवतो आणि कधीही विस्मरणात जाणार नाही अशी मनात जागा निर्माण करतो हे नक्की. इथल्या माणसांना कुत्रे पाळण्याचा खूप छंद आहे. बहुतेक माणसांकडे एक किंवा दोन कुत्री असतातच. त्यांना छान कपडे शिवलेले असतात. मी फिरायला जाताना अनेक प्रकारची कुत्री बघितली. तसेच पेय पिण्याची वेगळी सवय ही बघितली.. बहुतेक कॉफी किंवा इतर काही पेय हातात घेऊनच इथले लोक फिरतात. लिफ्ट असो वा रस्ता या सहज दिसणाऱ्या दोन गोष्टी होत्या. पण अनोळखी असूनही त्यांचे गोड हसणे, बोलणे तत्परतेने मदत करणे... हे सगळेच नेहमी लक्षात राहील सगळ्यात महत्वाची वागण्यातली ऋजुता मी पाहिलेंदाच इतक्या वर्षात इथे अनुभवली ती ही नक्कीच राहील. आता त्यांचा ब्लॅक फ्रायडे, ख्रिसमस येतोय सगळीकडे उत्साह आणि आनंद भरून वाहतोय. रस्त्यावर आणि मॉलमध्ये खूप छान लायटिंग केलेले आहे. त्यातली विविधता आणि रंग खूपच चमकते आहेत जणू आकाशातील तारका खाली उतरून आल्या आहेत असे वाटते. त्याचा आनंद घेत मी कॅनडाला निरोप देतीय. आता या परतीच्या पाऊल वाटा अनंत आठवणी सह नेहमीच माझ्या समवेत राहणार हे खरे.

# जगी सर्व सुखी असा कोण आहे? विचारे मना तूचि शोधुनी पाहे

ज्योतिर्मय साहित्य

स्वामी विवेकानंद म्हणत असत जीवन एक संघर्ष आहे. आणि स्वामींचे हे वाक्य कालातीत सत्य आहे. आपण छोट्या छोट्या अडचणी आल्या की नाराज होऊन जातो आणि हे विसरून जातो की सर्व प्राण्यात, आपण बुद्धिमान व हुशार प्राणी आहोत. आपण लगेच हार मानतो पण हरहर महादेव म्हणत कधीच आणखी जोशाने संकटाचा प्रतिकार करत नाही.



जीवनात अडचणी कुणाला नसतात? आणि खरं तर अडचणीतून माणसाला अनुभव येतो, तो शिकतो, समृद्ध होतो पण हे कधी ? तरअडचणीला धैर्याने सामोरे गेले तर? मी माझ्या बऱ्याच लेखात सतत लिहित असतो की जीवन म्हणजे सुखदुःखाचे मिश्रण असते. जीवनात कधी सुख कधी दुःख असे चक्र चालू असतं.

खरं तर माणसाने स्वतःवर विश्वास ठेवायला हवा. आपली स्वतःची बौद्धिक क्षमता, शारीरिक क्षमता याची साधारण जाण प्रत्येकाला असतेच. अपेक्षांचे ओझे बाळगून अशक्य ते शक्य करण्याचा प्रयोग अंगलट येऊ शकतो पण जीवन जगण्याच्या परीक्षेत आपण प्रत्येक वेळी यशस्वी होऊच असे नसते. कदाचित काही वेळेस यश मिळेल काही वेळेस नाही . पण कधी अपयश आले म्हणून नाराज होणे, नैराश्यात जाणे, जगणे सोडणे हे भित्रेपणाचे लक्षण म्हणावे लागेल.

खरं तर माणसाला चमकायचंच असेल, तर त्याला स्वतःचाच प्रकाश आणि झळकायचे असेल, तर स्वतःचेच तेज निर्माण करता आले पाहिजे. झाडावर बसलेला पक्षी फांदी हलल्यानंतरही कधीच घाबरत नाही. कारण त्याचा फांदीवर नाही, तर स्वतःच्या पंखावर विश्वास असतो की, फांदी हलली तरी मी पडणार नाही




इतकी घट्ट पकड आहे किंवा माझ्या पंखाने मी उडून जाईल पण खाली पडणार नाहीं, याची खात्री पक्ष्याला असते.

आपल्याला काही झाडावर बसायचं नाही किंवा उडायचेही नाही आणि पंख ही नाहीत. मात्र आपल्याला ईश्वराने प्रचंड बुद्धी दिली आहे. त्याचाच तर वापर करू आपण प्रगती करत असतो. मग मनाने का कधी हरावे? आणखी दुसरे म्हणजे आपल्याकडून कधी कधी चुका होत असतात. होऊ देत. चुकून झालेली चूक आपण सुधारू शकतो. त्या दृष्टीने विचार केला तर नवे पर्याय, नव्या वाटा सापडत जातात मात्र आपण ते शोधत गेले पाहिजे, आणि शोधले की सापडते.

व्यक्ती तितक्या प्रकृती असते. प्रत्येकाचा स्वभाव वेगळा असतो. आपण कुणाला बदलू शकत नाही पण स्वतः बदलले तर समोरची परिस्थिती बदलू शकते. येणारा प्रत्येक दिवस,प्रत्येक क्षण पुढे जाण्यासाठी येत असतो पण चांगल्या क्षणांच्या आठवणी जपू शकतो आणि त्या जपल्या पाहिजेत. विकायच ठरवलं तर फ ुले सुध्दा तराजुत टाकावीच लागतात, विकणाऱ्याने फुलांचं वजन विकावं, सुगंध वेडया माणसानं वजनात किती फुल येतात हे मोजू नये.

खरं तर आयुष्यात आपण कितीही शिकलो, पैसा, नाव, प्रसिद्धी, संपत्ती कमविली तरीही माणुसकीने जगणे नसेल तर सारेच अर्थहीन.

प्रत्येकाला आनंदी ठेवणे हे आपल्या हातात निश्चित नसतं पण प्रत्येका बरोबर आनंदी रहाणे हे मात्र निश्चीतच आपल्या आपल्या हातात असतं. आणि हे जमलं की जीवन सुगंधी होण्यास वेळ लागत नाही.

आणखी समाधान ही अंत:करणाची, सर्वात सुंदर संपत्ती आहे. ज्याला ही संपत्ती जमवण्याची किमया साधता आली, ती व्यक्ती जगात जीवनाबद्दल निराश होणार नाही आणि जगी सर्व सुखी असा कोण आहे? विचारे मना तूचि शोधुनी पाहे, हे मनात आले तर आपल्या मनाला मी जगात सर्वात सुखी नसेलही कदाचित पण बऱ्यापैकी सुखी आहे सांगता आले पाहिजे.

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी १०१, सी विंग, सिल्व्हर स्पेस सोसायटी, विशाल नगर, पिंपळे निलख, पुणे-४११००१ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.
या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743918559